दै. प्रजावाणी दि. १५/०१/२५

तिघे फरार:नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

# पाठलाग करून सात जुगारांना घेतले ताब्यात

प्रतिनिधी • नांदेड

मिल्लतनगर येथे पाण्याच्या टाकीजवळ बेकायदेशीर बदक छाप पत्त्यावर तिर्रट नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली. त्यावरून त्यांनी तेथे छापा मारला. मात्र, पोलिसांना बघताच सर्व आरोपी पळून गेले. त्यापैकी सात जणांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले असून, तिघे जण फरार झाले आहेत.

ग्रामीण ठाण्याचे पोनि ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विश्वदिप रोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. पकडलेल्या आरोपींमध्ये अल्ताफ मुक्तार खान (रा. हबिबीया कालनी), शेख मोईन शेख आयुब (रा. एकबालनगर), शेख अज्जु शेख मस्तान (रा. एकबालनगर), शेख वसीम शेख जाकीर (वय महेबुबिया कालनी), शेख सलमान शेख इपब्राहिम (रा. खुदबेनगर चौरस्ता), मोहम्मद युसूफ मो. उस्मान (रा. रहेमतनगर), मोहम्मद जुबेर मोहम्मद रब्बानी (रा. एकबालनगर) यांचा समावेश आहे.

पळून गेलेल्यांमध्ये गफारभाई (उमर कालनीदेगलुरनाका), छोटु (रा. मिल्लतनगर) आणि अस्लम (रा. एकंबालनगर) यांचा समावेश आहे. पकडलेल्या आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण ३७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त करून, सर्वांविरुद्ध गवेंद्र गंगाधर सिरसलवार यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दै. गोदातीर दि. १५/०१/२५

# मिल्लतनगर भागात जुगार अड्ड्यावर कारवाई; सात जुगारी अटक

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहराच्या मिल्लतनगर भागात तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या यावेळी सात जुगाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत जुगाऱ्यांवर कारवाई करण्याचे सर्व पोलीस ठाण्यांना दिले होते. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विश्वदिप रोडे व डी.बी. टिमने मिल्लतनगर, पाण्याच्या टाकीजवळ करुन सात जणांना पकडलें व तीन जण पलुन गेले. पकडलेल्या सात जणांना ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे नगदी पैसे, मोबाईल, जुगाराचे साहित्य असे एकुण ३७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ग्रेड पोउपनि कदम करत आहेत.

**अशी आहेत आरोपीची नावे**

आल्ताफ मुक्तार खान वय ३१ वर्ष, व्यवसाय मजुरी रा. हबिबीया कॉलनी, नांदेड, शेख मोईन शेख आयुब वय २४ वर्ष व्यसवाय मजुरी रा. एकबालनगर, नांदेड, शेख अज्जु शेख मस्तान वय १९ वर्ष व्यसवाय मिस्त्री रा. एकबालनगर नांदेड, शेख वसीम शेख जाकीर वय ३० वर्ष व्यसवाय मजुरी रा. महेबुबिया कॉलनी, नांदेड, शेख सलमान शेख इब्राहिम वय १९ वर्ष व्यसवाय मजुरी रा. खुदबेनगर, चौरस्ता, नांदेड, मोहम्मद युसुफ मो. उस्मान वय ४३ वर्ष व्यवसाय मजुरी रा. रहेमतनगर, नांदेड, मोहम्मद जुबेर मोहम्मद रब्बानी वय २७ वर्ष व्यवसाय किराणा दुकान रा. एकबालनगर, नांदेड, व पलुन गेलेले गफारभाई रा.उमर कॉलनी, देगलुरनाका, नांदेड, छोटु रा. मिल्लतनगर, नांदेड आणि अस्लम रा. एकबालनगर, नांदेड.